KALYAN DOMBIVLI MUNICIPAL CORPORATION
कल्याण डोंबिवली महानगरपालिका जि. ठाणे.
DIST. THANE

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका,कल्याण

## नगररचना विभाग

### भाग बांधकाम पूर्णत्वाचा दाखला

(इमारत क्र. १२, १३, १४ व १५ करीता)

जा.क्र.कडोंमपा/नरवि/सीसी/२७गावे/९२

दिनांक :– ०५/०८/२०२०

प्रति,

मे. रिजन्सी निर्माण लि.

वास्तूशिल्पकार : श्री. अनिल निरगुडे, कल्याण (प.)

स्ट्रक्चरल इंजिनिअर : मे. जे.डब्ल्यू कन्सल्टंट्स तर्फे श्री. अच्यूत वाटवे, पुणे.

वास्तुशिल्पकार श्री. अनिल निरगुडे, कल्याण यांचे दि. २०/०३/२०२० व दि. ११/०६/२०२० रोजीचे अर्जावरुन दाखला देण्यात येतो की, त्यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका हददीत मौजे–दावडी, ४४/२, ४७/१, ४८, ४९/१, ४९/२, ५०/१, ५०/२, ५०/४, ५०/५, ५१/२अ, ५१/४, ५२/२, ५४/१, स.नं. ९७, स.नं. १०१/३अ, ३ब, ३क, ३ड येथे कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचेकडील सुधारीत बांधकाम परवानगी जा.क्र.कडोमपा/नरवि/बांप/२७गावे/२०१८–१९/१४/७९, दिनांक १४/०८/२०१९ अन्वये १२७१९४.०० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडावर एकूण १८८९०१.७० चौ.मी. क्षेत्राचे मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे ४०५६५.८२ चौ.मी. क्षेत्राचे 'रहिवास' स्वरुपाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

सबब त्यांना सोबतच्या नकाशेमध्ये हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे तसेच खालील अटीवर बांधकामाची वापर परवानगी देण्यात येत आहे.

| इमारत क्रमांक | मजले | सदनिका | एकत्रित बांधीव क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| इमारत क्र. १२ व १५ | स्टिल्ट + पोडीयम + पहिला मजला ते तेवीस मजले | ०८ सदनिका (प्रत्येकी) (०८ x २३ x २ = ३६८) | २४१७७.९६ (१२०८८.९८ x २) |
| इमारत क्र. १३ व १४ | स्टिल्ट + पोडीयम + पहिला मजला ते तेवीस मजले | ०८ सदनिका (प्रत्येकी) (०८ x २३ x २ = ३६८) | १६३८७.८६ (८१९३.९३ x २) |
| | एकूण | ७३६ सदनिका | ४०५६५.८२ चौ.मी. |

अटी :–

१) भविष्यात रस्ता रुंदीकरणासाठी जागा लागल्यास ती इमारतीच्या सामासिक अंतरातून कडोंमपास विनामुल्य हस्तांतरित करावी लागेल.

२) पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पाणी पुरवठा सुधारणा होईपर्यंत महापालिकेची राहणार नाही.

३) जा.क्र.कडोमपा/नरवि/बांप/२७गावे/२०१८–१९/१४/७९, दिनांक १४/०८/२०१९ या सुधारीत बांधकाम परवानगी मधील अटी व शर्ती आपणावर बंधनकारक राहतील.

४) प्रकरणी म्हाडास हस्तांतरीत करावयाच्या सदनिका एक वर्षाचे आत हस्तांतरीत करुन त्याबाबत संबंधित विभागाचा ना हरकत दाखला सादर करणे आपणावर बंधनकारक राहील.

५) प्रकरणी विकास योजनेच्या १८.००मी. व २४.००मी. रुंद रस्त्याने तसेच आरक्षण क्र. **PG-17, Post Office** व **Telephone Exchange** ने बाधीत क्षेत्राची ताबा पावती व महसूल दफ्तरी ७/१२ उतारा सहा महिन्याचे आत महानगरपालिकेच्या नांवे करणे आपणावर बंधनकारक राहील, त्याशिवाय आपणास पुढील बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

६) प्रकरणी Covid -19 बाबत शासनाकडील संपूर्णपणे लॉकडाऊन उठविणेबाबत आदेश प्राप्त होत नाही, तोपर्यंत इमारतीमधील सदनिकेचा / दुकानांचा प्रत्यक्ष ताबा देऊ नये, याची नोंद घ्यावी.

सहाय्यक संचालक, नगररचना करिता

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

प्रत :–

१) उप आयुक्त ('इ' गव्हर्नन्स) यांना महानगरपालिका संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

२) कर निर्धारक व संकलक, क.डों.म.पा कल्याण

३) प्रभाग क्षेत्र अधिकारी '९(आय)' प्रभाग कार्यालय, क.डों.म.पा कल्याण